# महाराष्ट्र खो-खो संघाचा विजयाचा डबल धमाका; यजमान मध्य प्रदेशचे दोन्ही संघ पराभूत

- खेलो इंडिया युथ गेम्स २०२२-२३
- महाराष्ट्र महिला व पुरुष खो-खो संघाने जिंकला सलग दुसरा सामना
- महाराष्ट्र महिला संघ १ डाव व १२गुणांनी विजयी
- महाराष्ट्र पुरुष संघ एक डाव सहा गुणांनी विजयी





**जबलपूर : विशेष प्रतिनिधी**

चार वेळच्या किताब विजेत्या महाराष्ट्र महिला व पुरुष खो खो संघांनी आपले वर्चस्व अबाधित ठेवत खेलो इंडिया युथ गेम्स मध्ये मंगळवारी विजयाचा डबल धमाका उडवला. महाराष्ट्राच्या दोन्ही संघांनी पाचव्या सत्रातील या स्पर्धेत सलग दोन विजय साजरे केले आहेत. जानकी पुरस्कार विजेते जान्हवी पेठेच्या नेतृत्वात राष्ट्रीय खेळाडू प्रीती काळे, निशा वैजल, वृषाली, प्रतीक्षा आणि पायल यांनी सर्वोत्तम कामगिरी करत महाराष्ट्र महिला संघाला मोठा विजय मिळवून दिला. महाराष्ट्र महिला संघाने यजमान मध्य प्रदेशला १ डाव १२ गुणांनी पराभूत केले. त्या पाठोपाठ नरेंद्रच्या नेतृत्वात महाराष्ट्र पुरुष संघाने यजमान मध्य प्रदेश ला १ डाव व ६ गुणांनी धूळ चारली. त्यामुळे यजमान मध्य प्रदेश संघांना घरच्या मैदानावर लागोपाठ पराभवाचा धक्का सहन करावा लागला. आपली मोहीम कायम ठेवत महाराष्ट्र संघांनी गटात दोन विजय संपादन केले आहेत.

**प्रतीक्षा, पायल, निशाची कामगिरी लक्षवेधी**

महाराष्ट्र महिला संघाची विजय घोडदौड कायम ठेवण्यासाठी प्रतीक्षा, पायल, निशा यांची कामगिरी लक्षवेधी ठरली. त्यामुळे महाराष्ट्र संघाला डावाने विजयाची मोहीम कायम ठेवता आली. यादरम्यान प्रतीक्षाने अडीच मिनिटे सर्वोत्कृष्ट संरक्षण केले. तसेच तिने दोन गुण संपादन केले. त्या पाठोपाठ पायल ने दोन मिनिट पळती करत १६ गुणांची कमाई केली. सोलापूरच्या प्रीती काळेने संघाच्या विजयात सहा गुणांचे योगदान दिले. तसेच नाशिकच्या निशाने दोन मिनिट संरक्षण केले. कल्याणीने आठ गुण आणि वृषालीने सहा गुण संपादन केले. त्यामुळे महाराष्ट्र संघाला एक डाव बारा गुणांनी विजय साजरा करता आला.

**वैभव, निखिल, सचिनची कामगिरी उल्लेखनीय**

गदचंद्र महाराष्ट्र पुरुष संघाचे विजयात वैभव, निखिल, गणेश, सचिन यांची कामगिरी उल्लेखनीय ठरली. त्यामुळे महाराष्ट्र संघाला यजमान मध्यप्रदेश वर डावाने विजय संपादन करता आला. यादरम्यान वैभवने एक मिनिट वीस सेकंद नाबाद खेळी करत दोन गुण संपादन केले. त्या पाठोपाठ निखिलने १:२० मिनिटाची चमकदार कामगिरी करत सहा गुण संपादन केले. तसेच सचिनने चार गुण आणि रुपेशने सहा गुण मिळवत संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले. त्यामुळे नरेंद्रच्या नेतृत्वात महाराष्ट्र संघाला आपले वर्चस्व आबादी ठेवता आले.

**महाराष्ट्राची सर्वोत्तम कामगिरी; सोनेरी यशाकडे वाटचाल: कोच साप्ते**

महाराष्ट्र महिला संघाची स्पर्धेतील कामगिरी लक्षवेधी ठरत आहे. बालेवाडीत केलेल्या कसून सरावातून संघाला आता आपले डावपेच यशस्वी करता येत आहेत. सलगच्या दोन विजयातून महाराष्ट्र महिला संघाने किताबाचा आपला दावा मजबूत केला आहे. संघातील युवा खेळाडू प्रतीक्षा, निशा, प्रीती, पायल यांनी साजेशी कामगिरी करत संघाच्या विजयात मोलाचे योगदान दिले. त्यामुळे संघाची सोनेरी यशाकडे वाटचाल होत आहे, अशा शब्दात मुख्य प्रशिक्षक राजेंद्र साप्ते यांनी महिला संघावर कौतुकाचा वर्षाव केला.

**कसून मेहनतीमुळे वर्चस्व कायम: कोच मुंडे**

महाराष्ट्र महिला संघाने बालेवाडीत आयोजित सराव शिबिरात कसून सराव केला. याच कसून मेहनतीमुळे संघाला आता आपले वर्चस्व आबाधित ठेवण्याची संधी मिळत आहे. महाराष्ट्र संघाची सलग दोन्ही सामन्यातील कामगिरी लक्षवेधी ठरले. त्यामुळे निश्चितपणे महाराष्ट्र संघाला स्पर्धेत मोठे यश संपादन करता येणार आहे, अशा शब्दात सहाय्यक प्रशिक्षक संजय मुंडे यांनी संघाचे कौतुक केले.

**महाराष्ट्र संघांना विजयी हॅट्रिकची संधी**

सलग दोन सामने जिंकून आगेकूच करत असलेल्या महाराष्ट्र संघांना जबलपूरच्या मैदानावर विजयाची हॅट्रिक साजरी करण्याची संधी आहे. राष्ट्रीय खेळाडू नरेंद्रच्या नेतृत्वात महाराष्ट्र संघ गटातील तिसरा सामना बुधवारी पश्चिम बंगाल विरुद्ध खेळणार आहे. या सामन्यात महाराष्ट्र संघाला विजयाचा प्रबळ दावेदार मानले जात आहे. तसेच महाराष्ट्र महिला संघाचा गटातील तिसरा सामना पंजाब विरुद्ध होणार आहे. या सामन्यात महाराष्ट्राला मोठ्या फरकाने विजय संपादन करण्याची संधी आहे.

# महागाईचे चटके सोसणाऱ्या मुंबईकरांना मोठा दिलासा; सीएनजीच्या दरात मोठी कपात

**मुंबई : प्रतिनिधी**




महागाईमुळे बजेट बिघडलेल्या मुंबईकरांना महानगर गॅसने मोठा दिलासा दिला आहे. आज मध्यरात्रीपासून सीएनजीच्या दरात प्रतिकिलो २.५० रुपयांची कपात होणार आहे. महानगर गॅसने याबाबतची माहिती दिली आहे. त्यामुळे आधीच महागाईत होरपळणाऱ्या वाहनचालकांना मोठा दिलासा दिला आहे. आज मध्यरात्रीपासून हे नवीन दर जाहीर होणार आहेत.

मुंबई आणि आसपासच्या शहरात सीएनजीच्या किंमती कमी करण्यात आल्या आहेत. त्यामुळे एक किलो सीएनजीसाठी आता अडीच रुपये कमी मोजावे लागणार. आज मध्यरात्रीपासून नवीन किंमती नुसार ८७ रुपये प्रति किलो दराने मिळणार आहे. पेट्रोलच्या तुलनेत सीएनजीचे दर हे ४४ टक्क्यांनी स्वस्त असल्याचा दावा महानगर गॅसने केला आहे.

मुंबई आणि जवळील परिसरात महानगर गॅस लिमिटेड ही कंपनी प्रमुख सीएनजी, पीएनजी गॅस वितरक आहे. त्यामुळे सीएनजी गॅसच्या दर कपातीचा मोठा फायदा कार चालकांपासून ते रिक्षा चालकांनादेखील होणार आहे. सीएनजीच्या दरवाढीमुळे अनेकांचे बजेट बिघडले होते. या दरकपातीमुळे काही प्रमाणात दिलासा मिळणार आहे.

सीएनजीच्या किमतीत वाढ झाल्यामुळे, सीएनजी वाहनांच्या वापरामुळे ग्राहकांची पेट्रोल-डिझेलच्या तुलनेन खर्चात जास्त बचत होत नाही. सीएनजी आणि पेट्रोल-डिझेलच्या दरात फारसा फरक राहिला नव्हता. त्यामुळे ग्राहकांमध्ये नाराजी होती. त्याच्या परिणामी चालू आर्थिक वर्षात व्यावसायिक वाहनांमध्ये सीएनजीचा वापर कमी झाला असल्याचे समोर आले होते.

## पेट्रोल-डिझेलचे दर नियंत्रणात आणणार

**नवी दिल्ली :** आजपासून संसदेचं अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू होणार आहे. त्यानंतर उद्या म्हणजेच, १ फेब्रुवारी रोजी देशाचा सर्वसाधारण अर्थसंकल्प सादर होणार आहे. अर्थमंत्री निर्मला सीतारामन मोदी सरकारचा शेवटचा पूर्ण अर्थसंकल्प-२ सादर करतील. २०२४ हे वर्ष निवडणुकीचं वर्ष आहे, त्यामुळे मोदी सरकारच्या दुसऱ्या कार्यकाळातील हा शेवटचा अर्थसंकल्प असेल. त्यामुळे अर्थसंकल्पात मोदी सरकार काही सवलती देणार का? याकडे सर्वसामान्यांचं लक्ष आहे. तसेच, अर्थसंकल्पात पेट्रोल-डिझेलच्या वाढलेल्या किमती नियंत्रणात आणण्यासाठी काही घोषणा होऊ शकते का? याकडेही सर्वांच्या नजरा लागलेल्या आहेत. अशातच, आज भारतीय तेल कंपन्यांनी पेट्रोल-डिझेलचे दर जाहीर केले आहेत.

# एक, दोन नव्हे तर तब्बल ३३ जागांवर एकटेच निवडणूक लढवणार इम्रान खान, पक्षाने केली घोषणा

**इस्लामाबाद :**



भारताचा शेजारील देश असलेल्या पाकिस्तानमध्ये मार्चमध्ये ३३ जागांसाठी पोटनिवडणूक होणार आहे. या ३३ जागांसाठी होणाऱ्या पोटनिवडणुकीत पाकिस्तानचे माजी पंतप्रधान इम्रान खान हे त्यांच्या पक्षाचे एकमेव उमेदवार असणारा आहेत. याबाबत त्यांच्या पक्षानेच घोषणा केली आहे. पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफचे (पीटीआय) उपाध्यक्ष आणि माजी परराष्ट्र मंत्री शाह महमूद कुरेशी यांनी रविवारी संध्याकाळी लाहोरमध्ये पत्रकार परिषदेत सांगितले की, पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला आहे. कुरेशी म्हणाले की, 'सर्व ३३ लोकसभा जागांवर इम्रान खान हे पीटीआयचे एकमेव उमेदवार असतील. खान यांच्या अध्यक्षतेखाली रविवारी जमान पार्क लाहोर येथे झालेल्या पक्षाच्या कोअर कमिटीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

पाकिस्तानच्या निवडणूक आयोगाने (एडझ) शुक्रवारी जाहीर केले की, लोकसभेच्या ३३ जागांसाठी १६ मार्च रोजी पोटनिवडणूक होणार आहे. गेल्या वर्षी एप्रिलमध्ये अविश्वास प्रस्तावानंतर सत्तेतून पायउतार झालेल्या खान यांच्या पक्षातील खासदारांनी पाकिस्तानच्या संसदेचे (नॅशनल असेंब्ली) कनिष्ठ सभागृह सोडले. असं असलं तरी सभागृहाचे अध्यक्ष राजा परवेझ अश्रफ यांनी खासदारांचे राजीनामे स्वीकारले नाहीत आणि ते म्हणाले की, खासदार त्यांच्या स्वेच्छेने राजीनामा देत आहेत की दबावाखाली आहेत, याची त्यांना वैयक्तिकरित्या पडताळणी करणे आवश्यक आहे.

**सभापतींनी खासदारांचे राजीनामे स्वीकारले**

गेल्या महिन्यात स्पीकरने ३५ पीटीआय खासदारांचे राजीनामे स्वीकारले होते. त्यानंतर ईसीपीने त्यांना डी-नोटिफाइड केले. त्यानंतर स्पीकरने आणखी ३५ खासदारांचे राजीनामे स्वीकारले आणि उर्वरित ४३ पीटीआय खासदारांच्या राजीनाम्यानंतर, खान यांनी पंतप्रधान शेहबाज शरीफ यांना नॅशनल असेंब्लीमध्ये येत पुन्हा विश्वात मत घेण्यात यावे असं आव्हान केलं.

**इमरान खान यांनी आठपैकी सहा जागा जिंकल्या**

ईसीपीने आतापर्यंत पीटीआयच्या ४३ खासदारांना डी-नोटिफाइड केले आहे. जर ईसीपीने उर्वरित ४३ पीटीआय खासदारांना डी-नोटिफाइड केलं, तर खान यांचा पक्ष राष्ट्रीय असेंब्लीमधून हद्दपार होईल. गेल्या वर्षी ऑक्टोबरमध्ये अध्यक्षांनी पीटीआयच्या ११ खासदारांचे राजीनामे स्वीकारल्यानंतर खान यांनी आठ संसदीय जागा लढवल्या आणि सहा जिंकल्या.

## आर्थिक सर्वेक्षण अहवाल सादरीकरणानंतर बाजारात किंचित तेजी

**मुंबई : प्रतिनिधी**

१ फेब्रुवारी रोजी अर्थमंत्री निर्मला सीतारमण देशाचा अर्थसंकल्प सादर करणार आहेत. आज, निर्मला सीतारमण यांनी आर्थिक सर्वेक्षण अहवाल सादर केला. त्यानंतर बाजारात किंचीत तेजी दिसून आली. त्यानंतर आता, शेअर बाजारात अर्थसंकल्पाच्या दिवशी नेमकं कसं वातावरण असणार, याची चिंता गुंतवणूकदारांना लागली आहे. मागील १२-१३ वर्षांचा ट्रेंड लक्षात घेता, गुंतवणूकदारांना शेअर बाजारात दिलासा मिळण्याची शक्यता आहे. आज सादर झालेल्या आर्थिक सर्वेक्षणात काही सकारात्मक बाबी समोर आल्याने बाजारात तेजी दिसून आली.

गेल्या वर्षी १ फेब्रुवारीला अर्थसंकल्पाच्या दिवशी सेन्सेक्स ८४८ अंकांनी वधारला होता. सेन्सेक्स ५८,८६२.५७ च्या पातळीवर बंद झाला. तर निफ्टी २३७ अंकांच्या वाढीसह १७,५७७ वर बंद झाला होता.

१ फेब्रुवारी २०२१ रोजी अर्थसंकल्पाच्या दिवशी सेन्सेक्स ५ टक्क्यांनी वधारला होता. २०२० मध्ये अर्थसंकल्पाच्या दिवशी सेन्सेक्समध्ये २.४३ टक्क्यांची घसरण झाली. निफ्टीही हाच ट्रेंड दिसला होता. २०१९ मध्ये अर्थसंकल्पाच्या दिवशी सेन्सेक्स ०.५९ टक्क्यांच्या तेजीसह बंद झाला.

# 'विशाखापट्टणम' आंध्र प्रदेशची नवी राजधानी

## मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी यांची घोषणा

**चेन्नई : प्रतिनिधी**

'विशाखापट्टणम' ही आंध्र प्रदेशची नवीन राजधानी असल्याची घोषणा आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री वायएस जगन मोहन रेड्डी यांनी केली आहे. येत्या ३ आणि ४ मार्च रोजी आंध्र प्रदेशमध्ये जागतिक गुंतवणूक परिषदेचं आयोजन करण्यात येणार आहे. त्यासंबंधित आयोजित केलेल्या दिल्लीमधील एका कार्यक्रमात मुख्यमंत्री जगन मोहन रेड्डी ही घोषणा केली.

''आम्ही ३ आणि ४ मार्च रोजी विशाखापट्टणम येथे जागतिक शिखर परिषद आयोजित करत आहोत. मी तुम्हाला वैयक्तिकरित्या शिखर परिषदेसाठी आमंत्रित करण्यासाठी आलो आहे. विदेशी आणि देशांतर्गत गुंतवणूकदारांनी आमच्या नव्या राजधानीला भेट द्यावी आणि आंध्र प्रदेश राज्यात व्यवसाय करणे किती सोपे आहे ते पहावे, असे आवाहन यावेळी मुख्यमंत्री रेड्डी यांनी केले आहे. दरम्यान, या पूर्वीच मुख्यमंत्री रेड्डी यांनी विशाखापट्टणम हे राज्य प्रशासनाचे प्रमुख ठिकाण म्हणून प्रस्तावित केले होते. मुख्यालय म्हणून हेच राज्याच्या राज्यपालांचे ठिकाणही असेल. परंतु विधिमंडळाचे कामकाज अमरावतीतून चालणार आहे.



'विशाखापट्टणम'ला आंध्र प्रदेशची नवी राजधानी घोषणा करण्याआधी कृष्णा नदीच्या काठावरील प्राचीन वारसा असलेल्या अमरावतीची राजधानी म्हणून घोषणा करण्यात आली होती. परंतु ती रद्द करून विशाखापट्टणमला नवीन राजधानीची मान्यता देण्यात आली आहे.

पूर्वाश्रमीच्या आंध्रप्रदेश राज्याचे विभाजन होऊन तेलंगणा या नव्या राज्याची निर्मिती झाल्यानंतर हैद्राबाद हे महत्त्वाचं शहर तेलंगणाला राजधानी म्हणून मिळाले. त्यानंतर आंध्रप्रदेश सरकारने आपली राजधानी अमरावती घोषित करून त्यांच्या नव्या बांधणीसाठी विशेष प्रयत्न केले. अमरावतीमध्ये पायाभूत सुविधा निर्माण करण्यासाठी मोठी गुंतवणूक देखील करण्यात आली होती. एन. चंद्राबाबू नायडू यांच्या नेतृत्वाखालील टीडीपी सरकारने २०१५ मध्ये अमरावतीला राज्याची राजधानी म्हणून विकसित करण्यासाठी शेतकऱ्यांकडून ३३,००० एकर जमीन संपादित केली होती. परंतु याठिकाणी आता फक्त विधिमंडळाचे कामकाज चालणार आहे. तर विशाखापट्टणम ही आंध्र प्रदेशची राजधानी असणार आहे.

# जम्मू-काश्मीरमध्ये जोरदार बर्फवृष्टीमुळे जनजीवन विस्कळीत



## राष्ट्रीय महामार्ग बंद, श्रीनगर विमानतळावरील उड्डाणेही रद्द

**जम्मू : वृत्तसंस्था**

जम्मू आणि काश्मीरमध्ये बर्फवृष्टी होत आहे. गेल्या काही दिवसांपासून सतत होणाऱ्या हिमवर्षावामुळे येथील जनजीवन विस्कळीत झालं आहे. बर्फवृष्टीमुळे रस्ते तसेच हवाई वाहतुकीवरही मोठा परिणाम झाला आहे. हवामान विभागाकडून हिमस्खलनाबाबत धोक्याचा इशारा देण्यात आला आहे. काश्मीर खोऱ्यात सोमवारी झालेल्या बर्फवृष्टीमुळे श्रीनगर विमानतळावरील सर्व उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. खराब हवामानामुळे राष्ट्रीय महामार्गही बंद करण्यात आले आहेत. हवामान विभागाकडून नागरिकांना घराबाहेर न पडण्याचं आवाहन करण्यात येत आहे.

सततच्या बर्फवृष्टीमुळे येथील दृश्यमानता ५०० मीटरपेक्षा कमी झाली आहे. यामुळे श्रीनगर विमानतळावरील सर्व ६८ नियोजित उड्डाणे रद्द करण्यात आली आहेत. खराब हवामानामुळे बारामुल्ला-बनिहाल रेल्वे मार्गावरील रेल्वे सेवाही बंद करण्यात आली. मिळालेल्या माहितीनुसार, श्रीनगर शहरात सोमवारी जोरदार हिमवृष्टी झाली आहे. गुलमर्ग, पहलगाम, सोनमर्ग आणि इतर उंच भागात बर्फाची जाड चादर पसरली आहे.

जम्मू आणि काश्मीरमध्ये या मोसमातील पहिल्याच मोठ्या हिमवृष्टीने सर्वसामान्य जनजीवन विस्कळीत झालंय. घरांवर, रस्त्यावर चहुकडे बर्फच बर्फ दिसत आहे. साचलेल्या बर्फामुळे अनेक रस्त्यांवरी वाहतूक बंद झाली आहे. यामुळे रस्त्यांवर वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. प्रशासनाकडून रस्त्यावर साचलेला बर्फ हटवण्याचं काम युद्धपातळीवर सुरु आहे.

**तापमानात कमालीची घट**

बर्फवृष्टीमुळे सोमवारी श्रीनगरमधील किमान तापमान उणे ०.२, पहलगामचे उणे १.४ आणि गुलमर्गचे उणे ४.६ अंश सेल्सिअसवर पोहोचले होते. तर लडाख, कारगिलमध्ये किमान तापमान उणे ६.८ आणि लेहमध्ये उणे ०.६ अंश सेल्सिअस होते. जम्मूमध्ये १०.४, कटरा येथे ९, बटोटेमध्ये १.२, बनिहालमध्ये ०.२ आणि भदरवाहमध्ये उणे ०.६ अंश सेल्सिअस किमान तापमान होते. हवामान विभागाच्या (खचृ) माहितीनुसार, वायव्य भारतातील अनेक भागांमध्ये १ फेब्रुवारीपर्यंत किमान तापमानात २-३ डिग्री सेल्सिअसपर्यंत घसरण होण्याची शक्यता आहे.

**हवामान विभागाकडून हिमस्खलनाचा इशारा जारी**

काही भागांत हिमस्खलन होण्याची इशारा हवामान विभागाने दिला आहे. डोडा, किश्तवार आणि पूंछ जिल्ह्यात पुढील २४ तासांत समुद्रसपाटीपासून २,५०० मीटर उंचीवर हिमस्खलन होण्याची शक्यता आहे. हवामान विभागानुसार, येत्या २४ तासांत बांदीपोरा, बारामुल्ला, गंदरबल, कुपवाडा, कुलगाम आणि रामबन जिल्ह्यांमध्ये १,५०० ते २,५०० मीटरच्या वर हिमस्खलन होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या भागात राहणाऱ्या लोकांना खबरदारी घेण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आलं आहे.